QP : 3422

**वेळ : 3 तास** **एकूण गुण : १००**

**सूचना : १. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.**
**२. अंतर्गत पर्याय लक्षात घ्या.**
**३. प्रश्नासमोरील अंक गुण दर्शवितात.**

**प्रश्न १.** **अ.** अरुण शेवते संपादित 'नापास मुलांची गोष्ट' या आत्मचरित्रपर लेखसंग्रहात समाविष्ट झालेल्या व्यक्तिमत्त्वातील प्रेरणास्रोतांचा वेध घ्या. २०

**किंवा**

**ब.** 'दुसऱ्यावेळी पास झालो' या आत्मपर लेखनातील म. गांधी यांच्या जीवनानुभवातील पारदर्शकतेचे स्वरूप विस्ताराने नोंदवा.

**प्रश्न २.** **अ.** 'संगमनेरचे दिवस' या दया पवार यांच्या आत्मपर लेखातील भारतीय जातिव्यवस्थेच्या संदर्भांची नोंद घ्या. २०

**किंवा**

**ब.** ब. 'शंभरापैकी शून्य मार्क' मिळवून नापास झालेल्या प्रसंगानंतर ना.सी.फडके यांच्या महत्त्वकांक्षा जागृतीची गोष्ट विस्ताराने स्पष्ट करा.

**प्रश्न ३.** टिपा लिहा. **(कोणतेही दोन)** १०

१. सी. रामचंद्र यांची चित्रपट जगतातील यशाची गोष्ट
२. चंद्रशेखर धर्माधिकारी यांचा वकृत्वप्रवास
३. देवगडची यात्रा
४. यशवंत गडाख यांचे शालेय जीवन

**प्रश्न ४.** **अ.** इतिवृत्त लेखन म्हणजे काय ते सांगून अहवालात्मक इतिवृत्ताच्या लेखनाचे स्वरूप स्पष्ट करा. १०

**किंवा**

**ब.** वृत्तात्मक इतिवृत्तामागील उद्देशांची चर्चा करून तिच्या लेखनपद्धतींची नोंद घ्या.

**प्रश्न ५** **अ.** जाहिरातींच्या मूलभूत उद्देशांसह तिच्या मजकुरातील लक्षणीय घटकांची चर्चा करा. १०

**किंवा**

**ब.** नव्याने तयार केल्या गेलेल्या संगणकावरील मराठी स्पेलचेकर स्वॉफ्टवेअर ची मुद्रित माध्यमासाठी जाहिरात तयार करा.

**प्रश्न ६. खालील उताऱ्यावरील प्रश्नांची उत्तरे लिहा.** **१०**

मी झाड निसर्गातील सर्वांना थंडगार सावली देण्याचे काम मी करतो. माणूस, अन्य प्राणी माझ्या डेरेदार सावलीत तर खारुताई, सुतारपक्षी, पोपट माझ्या फांद्यावर येऊन बसतात. सध्याच्या आधुनिक आणि तंत्रज्ञानप्रिय जगात माझा अनेकांना विसर पडला आहे. सहलीला जाताना एखाद्या मोठ्या वडाच्या झाडाखाली बसून वनभोजन करणे कोणाला आवडत नाही. पण रस्ते रूंदीकरणासाठी तुम्ही अशीच झाडे तोडत राहिलात तर असे अनुभव तुम्ही कसे घेऊ शकाल. वडाच्या पारंब्यांना लटकणे, चोरून आंबे पाडणे, मोठ्या झाडाच्या फांदीला लटकणे या साऱ्या आठवणींनी तुमचे बालपण सजले होते. पण वाढत्या वृक्षतोडीने अशा अनुभवांना आता नख लागताहेत. तुमच्यासारखे आम्ही सुद्धा जिवंत आहोत, आम्हालाही भावना आहेत. तुमच्या प्रियजनांना थोडेसे खरचटले की, तुमची घालमेल होते. पण जंगलांना वणवे लावताना; करवत-कुऱ्हाडीने वृक्षांना कापताना तुम्हाला काहीच कसे वाटत नाही?

झाडाझुडपांमुळे जमिनीची धूप कमी होते. झाडांची मुळे माती धरून ठेवतात. याने जमिनीचा पोत टिकून राहतो. यामुळे कमीत कमी कृत्रिम, रासायनिक खतांच्या मदतीने चांगले पीक घेता येते. जर चांगली पिके आली तर शेतकऱ्याला कर्ज काढावे लागणार नाही, त्याला आत्महत्या करावी लागणार नाही. आदिवासी, गावातील गरीब लोक जंगलातून फळे, फुले, रानमेवा आणून विकतात. त्याच्यावर त्यांचे पोट चालते. झाड तोडून, वणवे लावून तुम्ही त्यांच्या पोटावर पाय ठेवत आहात.

तुम्ही जंगलात वणवे लावता, हजारो छोटे मोठे प्राणी, पक्षी मारले जातात, त्यांना स्थलांतर करावे लागते. जर तुमचे घर कोणी विनाकारण पेटवून दिले तर तुम्हाला कसे वाटेल? या सर्वांमुळे नकळत तुम्ही मानवी जीवनचक्र नासवत आहात. स्वतःच्या हातांनी आपला विनाश लिहीत आहात. तुम्ही खूप झाडे तोडली आहेत, पर्यावरणाचा खूप ऱ्हास केला आहे. अजूनही तुम्ही केलेली चूक सुधारण्याची संधी आहे. आणखी एखादं दशक असेच चालू राहिले तर काहीच करता येणार नाही. आज जसे आपण बाटलीतून पाणी पितो तसे भविष्यात बाटलीतून श्वास घ्यावा लागेल. आपल्या नंतरची पिढी पाणी आणि ऑक्सिजनसाठी एकमेकांचा जीव घेईल, तुम्हाला तुमच्या पुढच्या पिढीला हाच वारसा द्यायचा आहे का?

प्रश्नः

१. वाढत्या वृक्षतोडीने कोणत्या अनुभूतींना नख लागताहेत?

२. जमिनीचा पोत कशाने टिकून राहतो?

३. कोणत्या कृतीने माणूस स्वतःचा विनाश स्वतःच्या हाताने लिहीत आहे?

४. वाढत्या वृक्षतोडीने पुढील पिढी कशासाठी वणवण करेल? पाणी आणि ऑक्सिजन

५. प्रस्तुत उताऱ्यासाठी समर्पक शीर्षक द्या. विनाशाच्या उंबरठ्यावर

**प्रश्न ७. खालील उताऱ्याचे सारांशलेखन करा.** **१०**

फुले कोणाला आवडत नाहीत? ती सर्वांनाच आवडतात. कोणाला ती पूजेसाठी हवी असतात. कोणाला ती हारतुरे, गजरे किंवा वेणीसाठी हवी असतात. पण 'फुलांसाठी फुले' या भावनेने त्यांच्याकडे कोणी पाहत नाही. फुले शक्यतो वेलींवर किंवा फुलझाडांवर राहू द्यावीत. ती गळून पडली तर गोळा करावीत. पारिजातकाचा सडा आपण सतत पाहतच असतो. वेलीवरची फुले कोमेजण्याची वेळ जाणून घेतली व त्यापूर्वी काही तास ती तोडली तर फुलांच्या दृष्टीने ते न्यायाचे होईल. फुलांचा विचार असा भावनात्मक पातळीवरून करू नये, असे अनेकांना वाटेल; पण फुलांची कोमलता भावनांना स्पर्श करणारी असते. फुले म्हणजे निसर्गाचे भावकाव्यच जणू!

अशी ही फुले तशी कोणाचीच नसतात आणि तरीही ती सर्वांची असतात. रंग, रूप, गंध याची अख्खी उधळण करून आपले जीवन रसपूर्ण, अर्थपूर्ण, भावपूर्ण करण्याचे काम ती मूकपणे करीत राहतात. या फुलांचे उतराई व्हावे कसे? जड वस्तूची पूजा फुलांनी करण्याऐवजी फुलांची पूजा भावनांनी केली तर? ती अधिक फुलतील आणि जगाचे नंदनवन करतील.

**प्रश्न ८. पुढीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंधलेखन करा.** **१०**

अ. ग्रंथ हेच गुरू

ब. तंत्रज्ञानातील गती आणि माणसाची प्रगती

क. सांस्कृतिक विकास-काळाची गरज

ड. नद्यांच्या प्रदूषणांचे अव्हान

X0279Y428862X0279Y428862X0279Y428862X0279Y428862